# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२१

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २४ डिसेंबर, २०२१ / पौष ३, १९४३ ( शके )**

**(१) उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री**
**(२) ऊर्जा मंत्री**
**(३) इतर मागास बहुजन कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री**
**(४) आदिवासी विकास मंत्री**
**(५) सहकार, पणन मंत्री**
**(६) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४०**

---

### घुग्घुस (जि.चंद्रपूर) येथील ए.सी.सी सिमेंट कंपनीने स्वामीत्वधन न भरता उत्खनन केल्याबाबत

**(१) * ३३७९७ श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड)** : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घुग्घुस (जि.चंद्रपूर) येथील ए.सी.सी. सिमेंट उद्योगामुळे प्रदूषणाच्या वारंवार तक्रारी प्राप्त होऊनही गत ३० वर्षात ए.सी.सी. या सिमेंट कंपनीने अतिभाराच्या वाहतुकीच्या माध्यमातुन लाखो ब्रास कच्च्या मालाची स्वामीत्वधन न भरता उत्खनन करुन परस्पर विल्हेवाट लावून सिमेंट उत्पादन केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच शिंदोला (ता.वणी, जि.यवतमाळ) येथून ए.सी.सी सिमेंट कंपनीसाठी कच्च्या मालाचे उत्खनन केले जात असून शासनाने निर्धारीत केलेल्या नियमानुसार स्वामीत्वधन प्रदान करणे बंधनकारक असतांना क्षमतेपेक्षा जास्त कच्च्या मालाची वाहतुक करुन शासनाच्या कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविला जात असल्याचे निदर्शनास येऊनही शासन याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तदनुषंगाने शासनाचा महसूल बुडविणाऱ्या तसेच त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित दोषीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२), (३) व (४) मे.ए.सी.सी.सिमेंट कंपनीच्या घुग्घुस (जि.चंद्रपूर) येथील सिमेंट प्रकल्पाच्या अनुषंगाने, प्रदुषणाशी संबंधीत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, वस्तुनिष्ठ पडताळणी करुन, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेकडून तात्काळ कार्यवाही केली जाते.

"रस्त्यावर चालणाऱ्या अतिभार वाहनांची उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, यवतमाळ यांच्या वायुवेग पथकाकडून नियमित तपासणी केली जात असून, यामध्ये अतिभार वाहन आढळल्यास, त्यावर मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम ११३/१९४ नुसार कारवाई केली जाते. त्यानुसार एप्रिल, २०२१ ते ऑक्टोंबर, २०२१ या कालावधीत वायुवेग पथकाकडून तपासणी करताना ए.सी.सी. सिमेंट कंपनीचे एकही वाहन जादाभार वाहून नेताना आढळलेले नाही.

या ठिकाणी प्रमुख खनिजांचे वहन नियंत्रित करण्याकरिता ILMS ह्या संगणकीकृत प्रणालीचा वापर होत असून, वाहतूक करणारे नोंदणीकृत वाहन वजनकाट्यावर उभा राहताच या प्रणालीमार्फत खनिजाच्या वजनानुसार, ऑनलाईन वाहतूक परवाना प्रत्येकवेळी दिला जातो. त्याचवेळी वजनानुसार, प्रणालीमधून स्वामीत्वधनाची कपात केली जाते.

मंजूर आराखड्यानुसार सन २०२०-२१ मध्ये ६.०२ लक्ष टन इतके उत्खननास मंजूरी असून, प्रत्यक्षात खाणपट्टेधारकाने ४.४१ लक्ष टनाचे उत्खनन केले आहे. यातून स्वामीत्वधनापोटी शासनास ३.५३ कोटी इतकी रक्कम जमा झालेली आहे. सबब, मंजूर उत्खननापेक्षा, कमी उत्खनन झालेले असल्याने, जादा उत्खनन झाल्याची बाब खरी नाही.

अतिभार वाहतुकीच्या संदर्भात मा.संसद सदस्य यांनी दिनांक १७/११/२०२१ रोजी स्थानिक प्रशासनाकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, पुन्हा पडताळणी केली असता, अशाप्रकारे अतिभार वाहने आढळून आलेली नाहीत.

-----------------

**राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत**

**(२) * ३२५४८ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकऱ्यांना कर्जमाफी दिल्यानंतरही नापिकी नैसर्गिक आपत्ती व अन्य कारणांमुळे शेती पिकांचे नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे माहे जून ते ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धुळे तालुक्यातील देऊर बुद्रुक येथील तरुण शेतकऱ्याने कर्जफेडीच्या विवंचनेतून गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याचे दिनांक १५ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने किती प्रकरणे पात्र व अपात्र ठरविण्यात आली आहेत,

(४) असल्यास, आर्थिक सहाय्य करण्याची व प्रचलित आणेवारी पध्दतीचे निकष बदलून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना अपूऱ्या पडत असल्याने शेतकरी आत्महत्या कायमस्वरुपी थांबविण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

मौ. देऊर ब्रुद्रक येथील कै.योगेश बाबुराव शेवाळे यांनी दि.१२.१०.२०२१ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे.

(३) मौ. देऊर ब्रुद्रक येथील कै.योगेश बाबुराव शेवाळे यांनी केलेल्या आत्महत्येप्रकरणी चौकशी केली असता, सदर व्यक्तीच्या ७/१२ उताऱ्यावर इतर हक्कात रू.९९,०००/- चा बोजा आहे. परंतू सदर कर्ज दि.०७.०९.२०२० रोजी घेतल्याचे दिसते. सदर कर्ज थकित नसून चालू कर्ज आहे.

जून ते ऑक्टोबर, २०२१ या कालावधीत राज्यात एकूण १०७६ इतकी आत्महत्यांची प्रकरणे आढळून आली असून, त्यापैकी जिल्हास्तरीय समितीने ४९१ प्रकरणे पात्र ठरविली आहेत. एकूण २१३ प्रकरणे अपात्र ठरली असून, ३७२ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत. पात्र ४९१ प्रकरणांपैकी ४८२ प्रकरणी मदतीचे वाटप करण्यात आले आहे.

(४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दि.२३.०१.२००६ अन्वये नापिकी, राष्ट्रीयकृत बँक/सहकारी बँक किंवा मान्यताप्राप्त सावकराकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करू न शकल्यामुळे होणारा कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा या तीन कारणांमुळे आत्महत्या घडली असल्यास संबंधित शेतकऱ्यांच्या वारसांना रू.१.०० लक्ष इतकी मदत देय आहे.

खरीप २०१७ हंगामापासून केंद्र शासनाने लागू केलेल्या दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६ मधील कार्यपद्धतीनुसार राज्यात तालुकास्तरावर दुष्काळ घोषित करण्यात येऊन NDRF/SDRF च्या निकषानुसार बाधितांना दुष्काळी मदत देण्यात येते. आणेवारीच्या आधारे सवलती/अर्थसहाय्य देण्यात येत नाही.

(५) शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी प्रामुख्याने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

१) शेतकऱ्यांना समुपदेशनाची व प्रबोधनाची आवश्यकता विचारात घेऊन विविध उपाययोजना

२) विशेष मदतीच्या कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांच्या विकासासाठी “कृषी समृध्दी” योजनेच्या अनुषंगाने विविध विभागांकडून उपाययोजना करण्यात आल्या.

३) शेतकऱ्यांना अन्न सुरक्षा, आरोग्य सेवा, शेती विकासाचे कार्यक्रम राबविणे व त्यांच्या मुलांना मोफत शिक्षणाची योजना यांच्या अंमलबजावणीला गती देणे यासाठी कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची पुर्नरचना करण्यात आली आहे.

४) शेतमालाला हमीभाव, PM-KISAN सारख्या योजनांमार्फत शेतकऱ्यांवरील ताण कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना राबविण्यात येत आहे.

शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी उक्तप्रमाणे उपाययोजना राबविण्यात येत असल्याने विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महात्मा ज्योतिबा फुले कर्ज माफी योजनेंतर्गत नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याबाबत

**(३) * ३३००२ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्रीमती नमिता मुंदडा (केज), डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने अंतर्गत नियमित पिक कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना रुपये ५०,०००/- रक्कम प्रोत्साहनपर सानुग्रह अनुदान देण्याची शासनाने घोषणा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमित पिक कर्ज भरणारे हजारो शेतकरी प्रोत्साहनपर सानुग्रह अनुदानापासून वंचित असून कोविड-१९ प्रादुर्भावाने माहे एप्रिल, २०२१ पासुन सुरु असलेल्या लॉकडाऊनमुळे शेतकऱ्यांना प्रचंड आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी करण्यात आलेल्या घोषणेनुसार नियमित पिक कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर सानुग्रह अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) अल्पमुदत पीक कर्ज व अल्पमुदत पीक कर्जाचे केलेले पुनर्गठन / फेर पुनर्गठित कर्ज यांची रु. २.०० लाखापेक्षा जास्त थकबाकीची रक्कम असलेल्या खातेदारांना तसेच अल्पमुदतीच्या पीक कर्जाची नियमितपणे परतफेड करणाऱ्या खातेदारांना योग्य समर्पक योजनेद्वारे दिलासा देण्यासंदर्भात मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यात शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्यासाठी बँकेकडून जाणीवपुर्वक दुर्लक्ष होत असल्याबाबत

**(४) * ३३५७६ श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली)** : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यात बँकांकडून शेतकऱ्यांना पुनर्गठन व पिककर्ज देण्यास जाणीवपुर्वक दुर्लक्ष होत असल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत आला असल्याची बाब माहे जुलै २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकरी पुनर्गठन व नवीन पीक कर्जासाठी बँकेत ये-जा करत असताना बँकांकडून अनेक शेतकऱ्यांना पिककर्ज देण्याकडे जाणीव पुर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांना पीक कर्ज न देण्याची कारणे काय आहेत तसेच याबाबत शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) सन २०२१-२२ च्या खरीप हंगामात सेनगांव तालुक्यातील राष्ट्रीयकृत बँका, ग्रामिण बँका व जिल्हा मध्यवर्ती बँकांनी एकूण १६००० पात्र शेतकऱ्यांना ९७७१.८६ लाख कर्ज वाटप केलेले आहे. तसेच बँकांनी शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्यासंदर्भात क्षेत्रीय स्तरावरुन पाठपुरावा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हयातील गावांचा प्रधानमंत्री कुसुम सौर पंप योजनेत समावेश करण्याबाबत

**(५) * ३५५७६ श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्हयातील शेतकऱ्यांचे जीवन शेतीवरच अवलंबून असूनही ऐन मौसमात शेती पंपास पाच ते सहा तासच विदयुत पुरवठा केला जातो त्यामुळे उक्त जिल्हयात सौर पंपाची मागणी होत असतांनाही केंद्र सरकारतर्फे सौरपंपासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (MEDA) मार्फत सुरु करण्यात प्रधानमंत्री कुसुम सौर पंप योजनेंतर्गत केज मतदार संघातील जवळपास ४५ गावांचाच या योजनेत समावेश करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्रीय भूजल मंडळाच्या सन २०१५ च्या कार्यप्रणाली नुसार बीड जिल्हयाचे सन २०१९-२०२० चे भूजल मुल्यांकन पूर्ण करण्यात आले असून पाणलोट क्षेत्राची वर्गवारी ही सुरक्षित व अंशत: शोषित या मध्ये करण्यात आलेली असून बीड जिल्हयात शोषित व अतिशोषित पाणलोट क्षेत्र नाहीत त्यामुळे सर्वच गावांचा प्रधानमंत्री कुसुम सौर पंप योजनेत समावेश

करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उर्जा मंत्री यांना दिनांक १९ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन बीड जिल्ह्यातील व केज मतदार संघातील सुरक्षित व अशत: शोषित सर्व गावांचा प्रधानमंत्री कुसुम सौर पंप योजनेत समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) प्रधानमंत्री कुसुम योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार डार्क झोन व ग्रे झोन (Dark & Grey Zone) मध्ये सौर कृषी पंप सरसकट अनुज्ञेय नाही. बीड जिल्हयासंदर्भात भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा कार्यालय, बीड यांचेकडील दिनांक १४ जानेवारी, २०२१ रोजीच्या यादीनुसार जिल्हयातील केवळ ४४९ गावे सुरक्षित / अंशत: शोषित पाणलोट क्षेत्रात समाविष्ट होती. त्यानुसार कुसुम योजने अंतर्गत कार्यवाही करण्यात आली.

तद्नंतर भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा कार्यालय, बीड यांचेकडील दिनांक १५ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या यादीनुसार बीड जिल्हयातील सुरक्षित/अंशत: शोषित पाणलोट क्षेत्रात १३७१ गावे समाविष्ट होती. सदर गावांचा समावेश प्रधानमंत्री कुसुम सौर कृषी पंप योजनेअंतर्गत करण्यात आला आहे.
(२) होय.
(३) भूजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा कार्यालय, बीड यांच्या दिनांक १५ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या यादीनुसार केज तालुक्यातील १२२ गावांचा प्रधानमंत्री कुसुम सौर कृषी पंप योजनेअंतर्गत समावेश करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात भाजीपाल्याचे दर नियंत्रणात आणण्याबाबत

**(६) * ३३९५४ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण),**

**श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वच बाजारपेठेत भाजीपाल्याच्या दरात वाढ झाली असून भाजीपाला खरेदी करणे सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले असल्याचे दिनांक २४ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने भाजीपाल्याचे दर नियंत्रणात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) राज्यात जुलै, २०१६ मध्ये फळे व भाजीपाला नियमनमुक्त करण्यात आला आहे. यामुळे कृषि उत्पन्न बाजार समिती मधील  होणारी आवक नोंदवण्यात येते. तथापि, समितीबाहेरील विक्रीच्या माहितीची नोंद नसते. तसेच भाजीपाला पिके नाशवंत असल्याने किमान आधारभुत किंमत अंतर्गत येत नाहीत. राज्यातील बाजार समितीमधील भाजीपाला पिकांची सप्टेंबर, २०२० ते ऑक्टोबर, २०२१ मधील आवक व दराबाबतच्या आकडेवारीचे अवलोकन केले असता,  सप्टेबर, २०२० च्या तुलनेत सप्टेबर, २०२१ या कालावधीत आणि ऑक्टोंबर, २०२० च्या तुलनेत ऑक्टोबर, २०२१ या कालावधीत भाजीपाल्याच्या आवकमध्ये वाढ दिसत असून दर कमी झाल्याचे दिसून येते.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील महानिर्मितीच्या औष्णिक प्रकल्पांना कोळशाचा नियमित पुरवठा करण्याबाबत

**(७) * ३२४५० श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महानिर्मितीच्या औष्णिक प्रकल्पांना रोज ४० लाख मे.टन कोळशाची आवश्यकता असतानाही वेस्टर्न कोल फिल्डस लिमिटेड व अन्य कोळसा कंपन्याकडून केवळ १८ लाख मेट्रीक टन कोळशाचा पुरवठा होत असल्याने वीज उत्पादनात मोठी घट झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोळशाची भीषण टंचाई निर्माण झाल्याने राज्यातील औष्णिक वीजनिर्मिती केंद्रातील वीज निर्मिती संच बंद असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात वीज निर्मिती कमी झाल्याने खुल्या बाजारातून अधिक दराने शासनाला वीज खरेदी करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील वीज निर्मिती केंद्राना कोळशाचा मुबलक पुरवठा करुन भारनियमन टाळण्यासाठी तसेच उद्योगांना पुरेशी वीज उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

महानिर्मिती कंपनीला दररोज सरासरी एक ते सव्वा लाख मे.टन कोळशाची आवश्यकता असते. पावसाळयामध्ये कोळश्याचा पुरेसा पुरवठा करण्यामध्ये येणा-या अडचणी विचारात घेता दरवर्षी पावसाळयापुर्वी जून अखेर सरासरी १५ लाख मे. टन एवढा कोळसा साठा करण्याचे नियोजन केले जाते. त्यानुसार, चालू वर्षी १९ लाख मे. टन एवढा कोळसा साठा करण्यात आला होता. तथापि, ऑगस्ट २०२१ मध्ये वीजेची मागणी अनपेक्षितपणे दीडपट वाढल्यामुळे एका महिन्यात १० लाख मे. टन कोळसा जास्त लागला आणि कोळसा कंपन्यांकडे माहे सप्टेंबर, ऑक्टोबर वीज निर्मिती कमी झाल्यामुळे टंचाई परिस्थिती उदभवली होती. सबब, माहे सप्टेंबर-२०२१ मध्ये महानिर्मिती कंपनीच्या औष्णिक वीज केंद्रांना नियोजित कोळश्याच्या आवश्यकतेपेक्षा अपुरा कोळसा पुरवठा झाल्यामुळे पुरेशा कोळशा अभावी महानिर्मिती कंपनीचे २९६० मे.वॅ. क्षमतेचे ९ औष्णिक संच वेगवेगळया कालावधीसाठी बंद करणे महानिर्मिती कंपनीस भाग पडले तसेच काही औष्णिक वीज निर्मिती संच कमी क्षमतेवर संचलित करावे लागले.

राज्यातील उच्चतम मागणीच्या कालावधीत करारीत औष्णिक वीज निर्मिती केंद्राना आवश्यकतेनुसार अधिक क्षमतेने वीज निर्मिती करण्यासाठी सूचीत केले जात होते. तसेच, वीजेचा उर्वरीत तुटवटा भरुन काढण्यासाठी खुल्या बाजारातुन आवश्यकतेनुसार वीज खरेदी करण्यात येत होती. महावितरण कंपनीचा माहे ऑक्टोबर अखेरपर्यतचा वीज नियामक आयोगाकडून मान्यताप्राप्त वीज खरेदी दर रु. ४.०१ प्रति युनीट असून माहे ऑक्टोबर अखेरपर्यत प्रत्यक्षात आलेला सरासरी वीज खरेदी दर रु. ३.८९ प्रति युनीट (करारीत वीज निर्मिती प्रकल्पांमधून तसेच खुल्या बाजारातून खरेदी करण्यात आलेल्या वीजेचे दर ग्राहय धरुन ) इतका आहे.

महावितरण कंपनीतर्फे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये एकूण ४५२ द.ल.यु. वीज सरासरी रु. ४.२१ प्रति युनीट व माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये २७६ द.ल.यु. वीज सरासरी रु. ७.३० प्रति युनीट दराने खरेदी करण्यात आलेली आहे. तसेच, चालू आर्थिक वर्षात (२०२१-२२ मध्ये) माहे ऑक्टोबर, २०२१ अखेर पर्यत खुल्या बाजांरातून खरेदी करण्यात आलेल्या २२७२ द.ल.यु. वीजेचा सरासरी दर हा रु. ३.८२ प्रति युनीट आहे.

(४) राज्य शासनाने केंद्रिय कोळसा व ऊर्जा मंत्र्याच्या संपर्कात राहून अधिक कोळसा पुरवठयासंबंधी पाठपुरावा करण्यात आला तसेच महानिर्मिती कंपनीकडून केंद्रिय ऊर्जा आणि कोळसा विभागातील अधिकाऱ्यांची व्यक्तिश: भेट घेऊन चर्चेव्दारे अधिक कोळश्याची मागणी केली. तसेच केंद्रिय विद्युत प्राधिकरण, कोल इंडिया लि. व कोळसा मंत्रालय, भारत सरकार यांच्या समावेत बैठका घेतल्या. वेकोलि, नागपूर एस.ई.सी.एल. बिलासपूर यांच्याशी कोळसा साठा सुधारण्यासाठी नियमित बैठका घेतल्या. यामुळे सद्या आवश्यकतेनुसार कोळसा उपलब्ध होत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत पात्र विद्यार्थी लाभापासून वंचित असल्याबाबत

**(८) * ३६००४ श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत राज्यातील ज्या अनुसूचित जाती आणि नवबौध्द विद्यार्थ्यांना पात्र असूनही समाजकल्याण विभागाअंतर्गत शासकीय वसतीगृहात प्रवेश मिळाला नाही अशा विद्यार्थ्यांना, भाडयाने खोली घेता यावी या हेतूने शासनाने यापूर्वीच योजना अंमलात आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेअंतर्गत ११ वी १२ वी आणि १२ वी नंतरचे व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या उक्त मागासवर्ग घटकातील विद्यार्थ्यांना वसतीगृहाप्रमाणे भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता आदिंसाठी आर्थिक मदत शासनामार्फत करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेसाठी मागील पाच वर्षात शासनाने वर्षनिहाय एकूण रुपये ४२१.७७ कोटी रुपयांची विद्यार्थ्यांसाठी आर्थिक तरतूद करुन देखील गेल्या २ वर्षापासून विद्यार्थी आर्थिक लाभापासून वंचित असल्याचे दिनांक १ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निधी उपलब्ध असतांना विद्यार्थी आर्थिक लाभापासून वंचित राहण्याची कारणे काय आहेत, तसेच सदर योजना पुढील काळात बंद होण्यासारखी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे विद्यार्थी व पालक वर्गात असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन विद्यार्थ्यांना उक्त योजनेचा आर्थिक लाभ मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) होय.

(२) होय.

(३) मागील पाच वर्षात शासनाने एकूण रु.४२१.७७ कोटी तरतुद केली असून, सन २०१९-२०, सन २०२०-२१ या वर्षात रु.१३५ कोटी तरतूद उपलब्ध झाली आहे. त्यापैकी रु.१३२.५१ कोटी म्हणजेच ९८.१५% रक्कम खर्च झाली आहे. त्यामुळे विद्यार्थी लाभापासून वंचित आहेत हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महात्मा ज्योतीबा फुले कर्ज मुक्ती योजनेचा लाभ शेतकऱ्यांना मिळण्याबाबत

**(९) * ३३५६४ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: अकोला जिल्ह्यात महात्मा ज्योतीबा फुले शेतकरी कर्ज मुक्ती योजना २०१९ अंतर्गत फक्त १,१६,५४४ कर्जखाती योजनेच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कर्जखात्यांपैकी १,०५,९४४ खात्यांनाच पोर्टलवर विशिष्ट क्रमांक देऊन त्यामधील १,००,२२५ शेतकऱ्यांच्या खात्यात कर्ज मुक्तीची रक्कम जमा करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी योजनेच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या खातेदारांपैकी ३४८६ इतक्या कर्ज खात्याचे आतापर्यंत आधार प्रमाणीकरण करण्यात आले नसल्याने शेतकऱ्यांना अद्याप कर्ज मुक्तीचा लाभ देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील शेतकऱ्यांना महात्मा ज्योतीबा फुले शेतकरी कर्ज मुक्ती योजना व छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी कर्जमुक्ती योजना उक्त दोन्ही योजनेचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) होय

(२) व (३) महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत दिनांक २२.१०.२०२१ पर्यंत अकोला जिल्ह्यातील १,०४,२६४ लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण करण्यात आले आहे. सदर प्रमाणीकरण झालेल्या शेतकऱ्यांपैकी १,०१,५७१ लाभार्थ्यांच्या खात्यावर रु. ६३६.२७ कोटी रक्कमेचा लाभ वितरीत करण्यात आलेला असून उर्वरीत लाभार्थ्यांना लाभ देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत पात्र असलेल्या परंतू आधार प्रमाणीकरण न झालेल्या लाभार्थी शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करण्यासाठी शासनामार्फत दिनांक १५.१०.२०२१ ते दिनांक १५.११.२०२१ या कालावधीत विशेष मोहीम राबविण्यात आली. त्याकरीता प्रेस

नोट देवुन आकाशवाणी द्वारे तसेच त्यांनी बँकेत नोंदविलेल्या दुरध्वनी क्रमांकावर सहायक निबंधक कार्यालयामार्फत वारंवार संपर्क करुन उर्वरीत शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरण करुन घेणे बाबत विनंती करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डोंबिवली एम.आय.डी.सी. अंतर्गत असलेल्या उद्योगांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१०) * ३२५३६ श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवली एम.आय.डी.सी. परिसरात असलेल्या ११-२० कि.मी. रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्ता बांधण्यात येण्याऱ्या रु.११० कोटीच्या खर्चाचा ५० टक्के भार कल्याण-डोंबिवली महानगरपालिका एम.आय.डी.सी च्या माध्यमातून उचलला जात असून ५० टक्के म्हणजेच रु.५५ कोटीचा खर्च एम.आय.डी.सी.ला करावा लागणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रस्त्यासाठी येणाऱ्या ५५ कोटींचा खर्च एम.आय.डी.सी उद्योजकांकडून वसूल करीत असूनही त्यांचेकडून प्रती चौरस २५ प्रमाणे १७ वर्षे वसुली केली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांना मूलभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी एम.आय.डी.सी. ची असताना देखील एम.आय.डी.सी. त्याकडे जाणीपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे उद्योजकांचे मत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने एम.आय.डी.सी मार्फत सदरहू रस्त्याच्या दुरुस्तीसाठी येणारा ५५ कोटी रुपयांचा खर्च उद्योजकांकडून वसूल न करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, अंशत: खरे आहे.

डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील ३४.७६ कि.मी. लांबीच्या रस्त्यापैकी औद्योगिक क्षेत्रातील ११.२० कि.मी लांबीचे रस्ते म.औ.वि. महामंडळामार्फत करण्याचे ठरले. म.औ.वि. महामंडळामार्फत करावयाच्या रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाच्या कामासाठी रु. ५५.८३ कोटी (निव्वळ) ची तरतूद करण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) शासनाच्या धोरणानुसार डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील रस्ते व दिवाबत्ती कल्याण डोंबिवली महानगर पालिकेस १९८७ नंतर हस्तांतरीत केले आहे. सन-२००२ च्या शासन निर्णयानुसार या महानगरपालिका क्षेत्र हद्दीतील मौजे. आजदे, गोळीवली, सागाव व सोनारपाडा ही डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील गावे कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातून वगळण्यात आली होती. त्यामुळे महानगरपालिकेने देखभाल दुरुस्ती करणे बंद केले. त्यानंतर शासन स्तरावर घेतलेल्या निर्णयानुसार डोंबिवली औद्योगिक क्षेत्रामध्ये औद्योगिक नगरी स्थापन होईपर्यंत म.औ.वि. महामंडळ सेवाकर आकारुन देखभाल करण्याचे ठरले. तेव्हापासून म.औ.वि. महामंडळ सेवाकर नोव्हेंबर- २००४ पर्यंत आकारत होती. त्यानंतर उद्योजकांच्या संघटनेने २००५ मध्ये सेवाकर आकारुन कामे करण्याची म.औ.वि.महामंडळास विनंती प्राप्त झाली. त्याप्रमाणे म.औ.वि. महामंडळाने सन २००७ मध्ये रु. ४१.४७ कोटी इतका खर्च सदर कामावर करुन मार्च २०२१ पर्यंत रु. ६/- प्रती चौ.मी.दराने रु. ११.३३ कोटी जमा केले आहेत. दरम्यान जुलै, २०१५ मध्ये पुन्हा ही गावे कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्र हद्दीत समाविष्ट करण्यात आली. शासन स्तरावर दि. ०२/०३/२०२० रोजी घेतलेल्या निर्णयानुसार औद्योगिक क्षेत्रातील ११.२० कि.मी. रस्ते म.औ.वि. महामंडळाने दुरुस्त करण्याचे ठरले. त्याप्रमाणे म.औ.वि. महामंडळाने सदर रस्त्याचे कॉंक्रीटीकरणाकरीता रु. ५५.८३ कोटी (निव्वळ) इतक्या खर्चाच्या रक्कमेस टी.टी.सी. औद्योगिक क्षेत्राच्या धर्तीवर सेवाशुल्क आकारण्याच्या अटीस अधीन राहून प्रशासकीय मान्यता दि. १५/११/२०२१ रोजी प्रदान केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी विभागात झालेला खाऊ घोटाळा

**(११) * ३४९५८ श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत रस्ते कामात मोठया प्रमाणात झालेल्या गैरव्यवहाराबाबत चौकशी सुरु असताना आदिवासी विभागात २३१ कोटी रुपयांचा खाऊ घोटाळा झाला असल्याची बाब दिनांक १४ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गैरव्यवहाराबाबत चौकशी सुरु असून या प्रकरणी हिंगोली येथुन एका व्यक्तीस ताब्यात घेण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुसार संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) हे खरे नाही .
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील आदिवासी कुटुंब खावटी योजनेपासून वंचित असल्याबाबत

**(१२) * ३४८५४ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास विभागाअंतर्गत देण्यात येणाऱ्या खावटी योजनेपासून बुलढाणा जिल्ह्यातील अनेक आदिवासी कुटुंब वंचित असल्याची बाब दिनांक १० सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी लाभार्थ्यांनी खावटी योजनेचा लाभ मिळावा यासाठी केलेल्या अर्जाची दखल घेतली जात नसल्याची बाब देखील निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने खावटी योजनेपासून वंचित असलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील कुटुंबांना योजनाचा लाभ मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :**(१) हे खरे नाही .
(२) हे खरे नाही.

(३) खावटी योजनेतर्गंत बुलढाणा जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांची संख्या ८५३८ असून ८३२१ लाभार्थ्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा करण्यात आली असून ८४१९ लाभार्थ्यांना कीट वाटप करण्यात आले आहे. उर्वरित २१७ लाभार्थ्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा करण्याची व ११९ लाभार्थ्यांना कीट वाटप करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात आदिवासी बांधवांना खावटी योजनेंतर्गत कंत्राटदाराने निकृष्ट दर्जाच्या धान्याचा पुरवठा केल्याबाबत

**(१३) * ३३३८९ श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विभागामार्फत राज्यातील आदिवासी बांधवांना देण्यात येणाऱ्या खावटी योजनअतंर्गत दोन हजार रुपये बँक खात्यात व दोन हजार किंमतीचा किराणा माल देण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन हजार किंमतीचे किराणा मालाचे पुरवठा आदेश असताना कंत्राटारामार्फत ११२० रुपयांचा किराणा माल उशिरा पुरवठा करण्यात येत असून सदरहू करण्यात आलेला पुरवठा अत्यंत निकृष्ट दर्जाचा असल्याची तक्रार अनेक लोकप्रतिनिधींनी मा.राज्यपाल व शासनाकडे माहे सप्टेंबर २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कमी व निकृष्ट दर्जाचा माल दिल्याबद्दल कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) दि.९ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापन केलेल्या सुकाणू समितीच्या मान्यतेने किराणा मालाच्या खावटी किटचे दर मंजुर करण्यात आलेले आहेत.

ज्या ठिकाणी निकृष्ट दर्जाच्या खावटी किटचे पुरवठा झालेला होता.त्या ठिकाणी सदर किट त्वरित बदलून देणेबाबत संबंधित पुरवठादारासोबत झालेल्या करारनाम्यानुसार ते तात्काळ बदलून देण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.तसेच काही ठिकाणी सदर खावटी किट पुरवठा करताना विलंब झाला असून त्याचा करारनाम्यानुसार प्राप्त झालेल्या बिलापैकी विलंबाने पुरवठा झालेल्या खावटी किट वर करारनाम्यातील अटी शर्तीनुसार दंड आकारण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सन २०१८-१९ पासून लाभार्थ्यांना आंतरजातिय विवाहाचे अनुदान मिळाले नसल्याबाबत

**(१४) *३२७३० श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: रायगड, अमरावती जिल्हयात सन २०१८-१९ पासून आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना जिल्हा परिषद समाजकल्याण विभागामार्फत देण्यात येणारी आर्थिक मदत दिली जात नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाकडे अर्ज करुन देखील लाभार्थ्यांना अद्यापी योजनेचा लाभ मिळाला नसल्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन तातडीने अनुदान मिळण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) अंशतः खरे आहे.

(२), (३) व (४) आंतरजातिय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्य या योजनेंतर्गत रायगड येथे सन २०१८-२०१९ पासून प्रकरणे अनुदान अभावी प्रलंबित आहेत. तथापि, अमरावती येथे सन २०१८-२०१९ पर्यंत पात्र लाभार्थ्यांना अनुदान देण्यात आलेले आहे.

आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याची योजना ही केंद्र पुरस्कृत असून या योजनेसाठी केंद्र व राज्य शासनाकडून ५०:५० टक्के या प्रमाणात निधी प्राप्त होतो. केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्याशिवाय राज्य शासनाकडून राज्य समरुप हिस्सा वितरीत करता येत नाही. यास्तव सदर योजनेंतर्गत केंद्र हिस्सा प्राप्त होण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. सबब, या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून ५०% केंद्र हिस्सा प्राप्त होताच प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात येतील. सदर केंद्र पुरस्कृत (केंद्र/राज्य ५०:५०) योजनेंतर्गत सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात केंद्र हिस्सा प्राप्त होताच सदर योजनेंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

-----------------

## तळीये (ता.महाड, जि.रायगड) गावावर दरड कोसळून झालेली दुर्घटना

**(१५) * ३४१३३ श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळीये (ता.महाड, जि.रायगड) गावावर दरड कोसळून ६६ जणांचा मृत्यू झाला असून ४० ते ५० हून अधिक जण जखमी झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आपत्तीनंतर बचाव पथकांना दुर्घटनेच्या ठिकाणी दाखल होण्यास ६ ते १४ तासांचा कालावधी लागला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अशा प्रकारच्या दुर्घटना टाळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, दरड कोसळून मृत पावलेल्या व्यक्तींच्या वारसांना तसेच, जखमींना शासनाने आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार :** (१) होय, खरे आहे.

मौजे तळीये-कोंडाळकरवाडी व बौध्दवाडी ता.महाड जि.रायगड येथे दि.२२.०७.२०२१ रोजी दरड कोसळुन झालेल्या दुर्घटनेमध्ये एकूण ६६ घरांचे पूर्णत: नुकसान झाले असून ८७ व्यक्ती मयत व २ व्यक्ती जखमी झालेल्या आहेत.
(२) बचावपथके दुर्घटनेच्या ठिकाणाच्या जवळपास होती परंतु अतिवृष्टी व पुराच्या वेगवान प्रवाहामुळे बचाव पथकांना (NDRF, SDRF) दुर्घटनास्थळी पोहोचण्यास अडचणी येत होत्या. तसेच रात्रीची वेळ व अतिवृष्टीमुळे हेलिकॉप्टरला उड्डाण करता येत नव्हते. याबाबत मंत्रालय नियंत्रण कक्ष, जिल्हा प्रशासन व पोलिस प्रशासन सर्वोतोपरी कार्यरत होते.
(३) अशा दुर्घटना टाळण्याच्या दृष्टीने दरडग्रस्त गावांचा भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभाग (GSI) यांचेमार्फत प्राथमिक सर्व्हे करण्यात आलेला आहे त्यानुसार एकूण ६ गावांचा GSI अहवाल प्राप्त झालेला असून त्यानुसार सुचविलेल्या उपाययोजना नुसार कार्यवाही करण्यात येत आहे. उर्वरीत दरडग्रस्त गावांचे संपूर्ण सर्वेक्षण करण्यासाठी कळविण्यात आलेले आहे. GSI यांचेकडून दरडग्रस्त गावांचे परिपूर्ण सर्वेक्षणानंतर त्यानुसार आवश्यक त्या उपाययोजना करण्याची तजविज ठेवण्यात येत आहे. नागरिकांना दरडीचा धोका उद्भवू नये यासाठी भारतीय हवामान विभागाच्या सूचनांनुसार स्थलांतरणाच्या नोटीस वेळोवेळी दिल्या जातात.
(४) मौजे तळीये येथे दरड कोसळुन मृत पावलेल्या ८७ व्यक्तींपैकी ८२ व्यक्तींच्या वारसदारास प्रत्येकी ४ लाख असे एकूण ३ कोटी २८ लाख्र व मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून प्रत्येकी १ लाखप्रमाणे ८२ लाख असे एकूण ४ कोटी १० लाख इतकी रक्कम मयत व्यक्तींच्या वारसांना देण्यात आली आहे. उर्वरीत ५ मयत व्यक्तींच्या वारसामध्ये वाद असल्याने वारसपत्र प्राप्त होताच त्यांनाही मदत देण्यात येईल. त्याचप्रमाणे २ जखमींचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र दि. २६/१/२०२१ रोजी प्राप्त झाले असून त्यांना प्रत्येकी रु.५९१००/- प्रमाणे रु. १,१८,२००/- अर्थसहाय्य देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीककर्ज वाटप झाले नसल्याबाबत

**(१६) * ३५८१० डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील खरीप पीककर्ज वितरणात घट होऊन यावर्षी केवळ ८८,५४९ शेतकऱ्यांना राष्ट्रीयकृत, सहकारी व खासगी बँकांनी पीककर्ज दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साडेपाच लाखांवर शेतकऱ्यांना पीककर्ज मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पीककर्जापासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना कर्ज मिळण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) खरीप हंगाम २०२१-२२ करीता नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, राष्ट्रीयकृत बँका व खाजगी बँकांनी एकूण १.१२ लाख सभासदांना २०८६.५६ कोटीचे कर्जवाटप केलेले आहे. हे प्रमाण एकूण लक्षांकाच्या ७५.०६ % इतके आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) येथील कर्नाळा नागरी सहकारी बँकेत झालेला गैरव्यवहार

**(१७) * ३२४३९ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर):** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) येथील कर्नाळा नागरी सहकारी बँकेत ११२.२५ कोटी रकमेची बोगस कर्ज दाखवून कोट्यवधी रूपयांच्या केलेल्या गैरव्यवहारात सहभागी असलेले बँकचे संचालक व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी गृहमंत्री यांच्याकडे माहे ऑक्टोबर २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी १७ महिन्याचा कालावधी होऊनही अद्यापि गैरव्यवहारात दोषी असण्याऱ्यांवर कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने गैरव्यवहारात सहभागी असणा-या संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) होय.

कर्नाळा बँक ठेवीदार संघर्ष समितीने कर्नाळा नागरी सहकारी बँकेच्या गैरव्यवहारासंदर्भात मा. मंत्री (गृह) यांना सादर केलेले निवेदन मा. गृहमंत्री यांच्या कार्यालयाने दि. १२.१०.२०२१ रोजी अप्पर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (CID), म. रा. यांना तपासुन उचित कार्यवाही करण्यासाठी पाठविले आहे.

(२) व (३) रिझर्व्ह बँकेने दि. २२.०४.२०१९ रोजीच्या ई-मेलने कर्नाळा नागरी सहकारी बँकेच्या एकुण ५९ कर्जप्रकरणाची चौकशी करण्याचे सहकार आयुक्तांना निर्देश दिले होते. सदर निर्देशाच्या अनुषंगाने सहकार आयुक्तांनी दि.१०.०५.२०१९ रोजीच्या आदेशान्वये कर्नाळा नागरी सहकारी बँकेच्या तपासणीकरीता नियुक्ती केलेल्या जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, रायगड यांना रिझर्व्ह बँकेने निर्देशीत केलेली ५९ व इतर ४ अशा एकुण ६३ कर्ज प्रकरणात रु. ५१२.५४ कोटी इतक्या रक्कमेचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले.

त्यानुषंगाने सदर ६३ कर्जदार व बँकेचे संचालक मंडळ यांचेवर दि.१७.०२.२०२० रोजी पोलीस स्टेशन, पनवेल येथे गुन्हा क्रं. ७८/२०२०, दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (CID), म.रा., पुणे यांचेकडे वर्ग करण्यात आला असून तपासाचे कामकाज सुरु आहे.

सहकार आयुक्तांच्या दि. ०४.०२.२०२० रोजीच्या आदेशान्वये अधिनियमाचे कलम ८८ अन्वये नियुक्ती करण्यात आलेल्या जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे यांनी एकुण २० दोषी व्यक्तींविरुध्द रु. ५२९.३६ कोटी इतक्या रक्कमेचे दोषारोपपत्र बजावले असून संबंधितांच्या ७० मालमत्तांवर दि. २८.०५.२०२१ रोजी निवाड्यापुर्वी जप्तीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

रिझर्व्ह बँकेने दि. १३.०८.२०२१ च्या आदेशान्वये कर्नाळा नागरी सहकारी बँकेचा परवाना रद्द केला आहे. त्यानुसार सहकार आयुक्तांच्या दि. १७.०८.२०२१ रोजीच्या आदेशान्वये सदर बँकेवर सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सुधागड, पाली यांची अवसायक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील कोराडी वीज केंद्राला लागणाऱ्या वॉश कोलमध्ये भेसळ केल्याबाबत

**(१८) * ३२६२९ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोराडी औष्णिक (जि.नागपूर) येथील वीज केंद्राला लागणाऱ्या वॉश कोलमध्ये भेसळ करुन महानिर्मितीची फसवणूक केली जात असल्याचे माहे सप्टेंबर २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सामाजिक कार्यकर्त्यांनी दोन ट्रक पकडून दिले असून त्याबाबत खापरखेडा पोलीस चौकशी करीत असून, गोंडेगाव येथून वॉश केलेला कोळसा भरुन बाहेर पडलेल्या वाहनाचा क्रमांक वॉश न केलेला कोळसा भरलेल्या वाहनांना देण्यात येऊन वीज केंद्राला निकृष्ट दर्जाचा कोळसा पुरविला जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निकृष्ट दर्जाचा कोळसा पुरवठ्याची चौकशी सुरु असतांना चौकशी समितीचा अहवाल येण्यापूर्वीच परत त्याच कोहली रोड लाईन्स यांना कोळसा पुरवठ्याचा कंत्राट देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने निकृष्ट दर्जाचा कोळसा पूरविण्याऱ्या संबधित पुरवठादारावर तसेच संबधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) कोराडी येथील कोळसा वाहतूक (Raw Coal) दरम्यान कोळसा ट्रक आदलाबदल करुन गैरव्यवहार करण्याचा प्रकार निर्देशनास आल्यानंतर महानिर्मितीच्या कोराडी औष्णिक वीज केंद्रामार्फत पोलिस स्टेशन खापरखेडा येथे दाखल केलेल्या तक्रारीवर एफआयआर दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून पुढील तपास करण्यात येत आहे. तसेच, मे. कोहली रोड लाईन्स यांचे रस्ता वाहतूकीचे काम तातडीने स्थगित करण्यात आले आहे.

महानिर्मितीच्या सर्वच औष्णिक वीज केंद्रांचा कोळसा साठा अत्यंत कमी झाल्यामुळे नाशिक संच क्र.५ (२१० मे.वॅ.), भुसावळ संच क्र.३ (२१० मे.वॅ.), चंद्रपूर संच क्र.४ (२१० मे.वॅ.), कोराडी संच क्र.१० (६६० मे.वॅ.) आणि पारस संच क्र.४ (२५० मे.वॅ.) असे एकूण १५४० मे.वॅ. चे संच बंद करावे लागले त्यामुळे वीज निर्मितीवर विपरीत परिणाम होऊन महानिर्मितीला मोठे नुकसान सोसावे लागले यावर उपाय म्हणून ऊर्जा मंत्रालय व कोळसा मंत्रालयाकडून महाजेनकोला जास्तीत जास्त कोळसा डब्लु.सी.एल. (WCL), एस.ई.सी.एल (SECL) आणि एम.सी.एल. (MCL) या खाणीमधुन रोड कम रेलच्या माध्यमाने त्वरीत उचलण्यासाठी प्रस्ताव देण्यात आला. या प्रस्तावाची पूर्तता करण्यासाठी तातडीची उपाययोजना म्हणून रोड कम रेलच्या माध्यमातून चालू असलेल्या कंत्राटाच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून कोहली रोडलाईन्स यांना तत्पूर्वीच सदर घटना घडण्यापूर्वीच झालेल्या प्रक्रियेव्दारे कार्यादेश देण्यात आला आहे.

(४) व (५) महानिर्मिती कंपनीमार्फत सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यात आली असून उक्त चौकशी दरम्यान निर्देशनास आल्यानुसार महानिर्मितीचे संबंधित कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता व दोन कनिष्ठ सुरक्षा अधिकारी यांना निलंबित करण्यात आले असून अवैध कोळसा वाहतूक प्रकरणी मे. कोहली रोड लाईन्स या कंत्राटदारास रु.३,००,९६८/- दंड ठोठावण्यात आला आहे.

-----------------

## गेवराई (जि.बीड) तालुक्यातील संजय गांधी श्रावण बाळ तसेच कुटूंब अर्थसहाय्य योजनेअंतर्गत लाभार्थी लाभापासून वंचित असल्याबाबत

**(१९) * ३३३४९ श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) तालुक्यातील संजय गांधी श्रावण बाळ योजनेंतर्गत व कुटूंब अर्थसहाय्य योजनेंतर्गत सन २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ मध्ये दाखल केलेली प्रकरणे प्रशासनाने वेळेत निकाली न काढल्यामुळे पात्र लाभार्थी या योजनेच्या लाभापासून वंचित असल्याचे निदशर्नास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रितनिधींनी सदर प्रलंबित प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्याची मागणी दिनांक १६ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देऊन केली तसेच दिनांक ०१ मे, २०२१ रोजी तहसिल कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा देखील दिला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गरजू पात्र लाभार्थ्यांना संजय गांधी श्रावण बाळ व कुटूंब अर्थसहाय्य योजनेचा लाभ मिळण्यासाठी दाखल केलेली प्रकरणे तात्काळ निकाली काढून दिवाळीपूर्वी लाभार्थ्यांना मदत मिळवून देण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही

(२) होय

(३) गेवराई तालुक्यातील संजय गांधी योजना समितीच्या बैठका घेण्यात आल्या असून सन २०१८-१९ मध्ये १३३४५, सन २०१९-२० मध्ये १०३५, सन २०२०-२१ मध्ये ८४२ तर सन २०२१-२२ मध्ये ११३१९ अर्ज निकाली काढण्यात आले असून योजनेतील लाभार्थ्यांना माहे ऑक्टोबर, २०२१ पर्यंतचे अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले आहे. तसेच राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेतंर्गत ४३७ अर्ज निकाली काढण्यात आले असून पात्र लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## येवदा (ता.दर्यापूर, जि.अमरावती) येथील शेतकऱ्यांच्या शेतात पुराचे पाणी गेल्याने झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याबाबत

**(२०) * ३४००४ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापुर (जि.अमरावती) तालुक्यातील येवदा शिवारात नाल्याचा बांध वाहून शेतकऱ्यांच्या शेतात पुराचे पाणी गेल्याने प्रंचड प्रमाणात शेतीचे नुकसान झाल्याची बाब माहे जुन, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी तातडीने पंचनामे करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार :** (१) खरे आहे,

(२) जून, २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे दर्यापूर (जि. अमरावती) तालुक्यातील येवदा येथील शेतकऱ्यांच्या शेतीपिकांच्या झालेल्या नुकसानीकरिता रू.२३,४९,३३२/- इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला असून बाधितांना निधी वितरीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भंडारा व गोंदिया जिल्हयातील शेतकऱ्यांच्या कृषि पंपाना वीज जोडण्यासाठी निधी देण्याबाबत

**(२१) * ३५२४७ श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा व गोंदिया जिल्हयातील ५५०० शेतकऱ्यांनी कृषिपंप वीज जोडणी मिळावी यासाठी महावितरणाकडे रितसर अर्ज करुन वीज जोडणीसाठी लागणारे पैसे भरुन देखील शेतकऱ्यांना वीज जोडणी अद्यापपर्यंत देण्यात आली नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरण कंपनीकडे निधी नसल्याने शेतकऱ्यांना वीज जोडणी देणे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन महावितरण कंपनीला निधी उपलब्ध करुन शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी वीज जोडणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) हे खरे आहे.

माहे सप्टेंबर २०२१ अखेर भंडारा जिल्हयामध्ये ३८४५ कृषीपंप व गोंदिया जिल्हयामध्ये ५८३१ कृषीपंप पैसे भरुन वीज जोडणीकरिता प्रलंबित होते.

(२) हे खरे नाही.

भंडारा जिल्हयातील सप्टेंबर, २०२१ अखेर पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ३८४५ कृषीपंपापैकी मार्च, २०१८ पूर्वीचे ४६१ कृषीपंप व मार्च, २०१८ नंतरचे ३३८४ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते. यामध्ये मार्च, २०१८ पूर्वीच्या प्रलंबित ४६१ कृषीपंपापैकी २८१ कृषीपंपाना दिलेल्या वीज जोडण्यांचा समावेश असून उर्वरित १८० कृषीपंपाची कामे प्रगतीपथावर आहेत, तसेच मार्च, २०१८ नंतरच्या पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ३३८४ कृषीपंपापैकी ८८३ कृषीपंपांचे कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत ऊर्जीकरण करण्यात आले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

गोंदिया जिल्हयातील सप्टेंबर, २०२१ अखेर पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ५८३१ कृषीपंपापैकी मार्च, २०१८ पूर्वीचे १८२ कृषीपंप व मार्च, २०१८ नंतरचे ५६४९ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते. यामध्ये मार्च, २०१८ पूर्वीच्या प्रलंबित १८२ कृषीपंपापैकी १५४ कृषीपंपांना दिलेल्या वीज जोडण्यांचा समावेश असून उर्वरित २८ कृषीपंपांची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच मार्च, २०१८ नंतरच्या पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ५६४९ कृषीपंपांपैकी १५११ कृषीपंपांचे कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत ऊर्जीकरण करण्यात आले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० नुसार ग्रामपंचायत स्तरावर जमा झालेल्या वीज बिल रक्कमेच्या ३३% रक्कम त्या ग्रामपंचायतीमधील नवीन जोडणी तसेच पायाभुत सुविधा व विद्युत प्रणाली सक्षमीकरण व

बळकटीकरण करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर विभागीय कार्यालयाव्दारे वापरण्यात येतो. सप्टेंबर, २०२१ अखेर भंडारा जिल्हयाअंतर्गत रु. ४९१.२६ लक्ष रुपये व गोंदिया जिल्हयाअंतर्गत रु. ४७५.७९ लक्ष रुपये इतका ग्रामपंचायत स्तरावरील जमा निधितून अनुक्रमे रु. १२२.३ लक्ष रुपये व गोंदिया जिल्हयाकरिता रु. ५९.२७ लक्ष असे एकूण रु. १८१.५५ लक्ष रुपयाचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मागासवर्गीय विद्‌यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्याबाबत

**(२२) * ३२९५५ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयासह राज्यातील सामाजिकदृष्ट्या मागास, अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागास वर्गातील विद्‌यार्थ्यांना पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणासाठी दिली जाणारी शिष्यवृत्ती विविध कारणांमुळे गत काही वर्षात मिळाली नसल्याने परिणामी शुल्क भरू न शकलेल्या विद्‌यार्थ्यांची कागदपत्रे महाविद्‌यालयाने राखून ठेवल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने सदरहू विद्‌यार्थ्यांकरिता सरसकट शिष्यवृत्ती लागू केलेली असतानाही राज्य शासनाने याची अंमलबजावणी केली नसल्याने मागासवर्गीय विद्‌यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी मंजूर करण्यात आलेला निधी अपुरा पडत असल्याने सदरची शिष्यवृत्ती विद्‌यार्थ्यांना मिळू शकलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील अभिमत आणि खाजगी विद्यापिठात व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे गत पाच वर्षांपासून “फ्री-शीप” योजनेपासून वंचित राहावे लागले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर योजनेची तातडीने अंमलबजावणी करुन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्ती मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

मात्र निधीअभावी सदर शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना मिळू शकलेली नाही हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) राज्यातील अभिमत आणि खाजगी विद्यापिठात व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाची शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना लागू करण्याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपिठ जनहित याचिका क्र. ६९/२०११ मध्ये दाखल अवमान याचिका क्र. ११९/२०२१ च्या अनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही शासनस्तरावर चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हापरिषदेच्या समाजकल्याण विभागात झालेला गैरव्यवहार

**(२३) * ३२६०३ श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात पूर्णवेळ समाजकल्याण अधिकारी नसल्याने येथील जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागात २२ लाखांचा गैरव्यवहार झाला असल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समाजकल्याण निरिक्षक यांनी वसतिगृह कर्मचारी मानधन देयकात मूळ मान्य कर्मचाऱ्यांऐवजी इतरांची नावे टाकून गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने लाखो रुपयाची देयके अदा करुन गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) तसेच, उक्त प्रकरणी पूर्णवेळ समाजकल्याण अधिकारी नियुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखापरिक्षा नांदेड यांचे मार्फत तपासणी करून लेखापरीक्षण करण्यात आले आहे, त्या अनुषंगाने रूपये २३,९७,७५०/- रक्कमेचा अपहार झाला असून त्यापैकी संबंधितांनी रक्कम रूपये २२,१३,७५०/- शासन खाती भरणा केलेली आहे. उर्वरीत रक्कम रूपये १,८४,०००/- वसूल करून शासन खाती भरणा करण्याबाबत सदर लेखापरिक्षणात आक्षेप नोंदविले आहेत.

सदर अपहार प्रकरणी श्री अनिल बोरीकर यांना आयुक्तालयाचे आदेश दि.०८.०३.२०२१ अन्वये निलंबित करण्यात आले आहे.

(४) सद्यःस्थितीत जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद या पदाचा अतिरीक्त कार्यभार समाज कल्याण विभागाचे गट-अ संवर्गातील अन्य अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आलेला असून, कामकाज सुरळितपणे सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात टोमॅटोला हमीभाव मिळण्याबाबत

**(२४) * ३३२३० श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव):** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: जत (जि.सांगली) तालुक्यामध्ये शेतकऱ्यांनी लाखो रुपये खर्च करुन पिकविलेल्या टोमॅटोला कवडीमोल बाजारभाव मिळाल्याने टोमॅटो थेट रस्त्यांवर फेकून संताप व्यक्त केल्याचा प्रकार माहे सप्टेंबर, २०२१ वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टोमॅटोचे भाव पडल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे तद्नुषंगाने शेतकऱ्यांचे नुकसान कमी होण्याच्या दृष्टीने कृषि मालाचे प्रक्रिया उद्योग स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन टोमॅटोला हमीभाव देवून कृषि मालाचे प्रक्रिया उद्योग स्थापन करुन कृषि निर्यातीत राज्याच्या टक्का वाढविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) राज्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतीमालास योग्य व रास्त भाव मिळावा व त्यानुषंगाने पूरक रोजगार निर्मिती व्हावी, या उद्देशाने राष्ट्रीय सहकारी विकास निगम योजनेंतर्गत राज्यातील कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना कर्ज आणि शासकीय भागभांडवल उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक १२.१०.२००७ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला आहे. तसेच मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना राज्यात सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून पुढील पाच वर्षाकरिता राबविण्यास दिनांक २०.०६.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# नागपूर आदिवासी विकास विभाग प्रकल्पांतर्गत अनुदानित आश्रम शाळेतील शिक्षकाचे थकीत वेतन अदा करण्याबाबत

**(२५) * ३४२९४ श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर आदिवासी विकास विभाग प्रकल्पा अंतर्गत १४ अनुदानित आश्रम शाळेतील ४५० शिक्षकांचे वेतन गत ३ महिन्यांपासून मिळाले नसल्याचे दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधीत शिक्षकांचे वेतन अदा करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) व (२) होय, हे अंशतः खरे आहे.

प्रकल्प अधिकारी, नागपुर अंतर्गत १७ अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे माहे जून, २०२१ ते सप्टेंबर, २०२१ या कालावधीचे वेतन विलंबाने झाले हे खरे आहे.

जून, २०२१ मध्ये प्रकल्प अधिकारी कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्याने तसेच जुलै-२०२१ व ऑगस्ट-२०२१ च्या वेतनदेयकास कोषागार कार्यालयाकडुन त्रुटी दर्शविल्याने व या त्रुटींची पुर्तता करुन देयके कोषागार कार्यालयास फेरसादर करण्यासाठी काही कालावधी लागल्याने या वेतनास विलंब झालेला आहे. तथापि माहे ऑक्टोबर २०२१ अखेरचे वेतन अदा करण्यात आले असुन, अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन विहित वेळेत करण्याबाबत संबंधितांना वेळोवेळी निर्देश देण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मागासवर्ग आयोगास इम्पीरिकल डाटा गोळा करण्याच्या कामासाठी निधी मिळण्याबाबत

**(२६) * ३३५३७ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ओबीसी समाजाचा इम्पीरिकल डाटा गोळा करण्याचे काम राज्य मागासवर्ग आयोगाला दिले असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामासाठी शासनाने ४३१ कोटीची तरतूद करुन देखील अद्याप पर्यंत आयोगाला निधी मिळाला नसल्याने अध्यादेश काढून चार महिने झाले असून देखील आयोगाच्या कामाला सुरुवात झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ओबीसी समाजातील विविध जातींचा इम्पीरिकल डाटा गोळा झाल्यास राजकारणातील आरक्षणा बरोबरच सामाजिक, शैक्षणिक व नोकरीसाठी ही उपयुक्त होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ओबीसी समाजाचा इम्पीरिकल डाटा गोळा करण्यासाठी तरतूद केलेला निधी मागासवर्ग आयोगाला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विजय वडेट्टीवार :** (१) मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका (सिव्हिल) क्र. ९८०/२०१९ मध्ये दि. ०४/०३/२०२१ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन स्थानिक स्वराज्य संस्थामधील आरक्षणाशी संबंधित विनिर्दिष्ठ कामे पार पाडण्यासाठी महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगास शासन अधिसूचना दि. २९/०६/२०२१ अन्वये समर्पित आयोग म्हणून घोषित करण्यात आले व आयोगाची कार्यकक्षा निश्चित करण्यात आली, हे खरे आहे.

(२), (३) व (४) आयोगाने त्यांचेवर सोपविलेले कामकाज पार पाडण्यासाठी रु. ४३५ कोटीचे संभाव्य अंदाजपत्रक तयार करुन शासनास रु.५ कोटीची प्रथम मागणी केली. सदर बाब शासनाच्या विचाराधिन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर विभागातील शेतकऱ्यांना महात्मा ज्योतीबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळण्याबाबत

**(२७) * ३३९१२ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागातील ३२ हजार शेतकरी महात्मा ज्योतीबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या लाभाच्या प्रतिक्षेत असल्याबाबतची बाब माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर विभागातील जिल्हानिहाय नागपूर ३,७५८, वर्धा ६,०३३, भंडारा ५,४९०, गोंदिया २,८३५, चंद्रपूर ११,६७५, गडचिरोली २,१३९, असे एकुण ३१,९३० शेतकरी कर्जमुक्तीच्या प्रतिक्षेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूरातील बँकांकडून या योजनेसाठी एकूण २ लाख १६ हजार १६० शेतकरी कर्जमुक्तीसाठी शेतकऱ्यांना देण्यात आले होते, परंतु त्यापैकी फक्त १ लाख, ८४ हजार, २३० सभासदांच्या खात्यात पैसे जमा करण्यात आले असून उर्वरीत ३१,९३० शेतकऱ्यांना महात्मा ज्योतीबा फुले कर्जमुक्ती योजनेचा लाभ अद्यापपर्यंत मिळाला नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन उर्वरीत ३१,९३० शेतकऱ्यांना महात्मा ज्योतीबा फुले कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१), (२), (३) व (४) महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत नागपूर विभागात २,३०,३४६ पात्र कर्जखात्यांचे आधार प्रमाणीकरण झालेले आहे. त्यापैकी २,२५,६१२ शेतकऱ्यांना रु. १५०४.९९ कोटी कर्जमाफीचा लाभ देण्यात आला असून उर्वरीत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना लाभ देण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात उद्योग वाढीसाठी आराखडा तयार करण्याबाबत

**(२८) * ३५८१७ श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था सन २०२५ पर्यंत एक लाख कोटी डॉलर्सपर्यंत विस्तारण्यासाठी उद्योग वाढीचा आराखडा तयार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सेवा, माहिती तंत्रज्ञान, बल्क ड्रग्स पार्क, अन्नप्रक्रिया, मनोरंजन क्षेत्र आणि विविध क्षेत्रासाठी स्वतंत्र धोरणे तयार करून अशा उद्योगांना आकर्षक सवलती देण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मनोरंजन क्षेत्र आणि विविध क्षेत्रासाठी स्वतंत्र धोरणे तयार करून अशा उद्योगांना तसेच औद्योगीकरण व आर्थिक विकासाचा विचार करताना तसेच या उद्योगांना परवाने मान्यता या सर्व प्रक्रिया पुढील काळात अधिक सुलभ करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात उद्योग सुरु करण्यासाठी अनेक कायदे वा नियमांनुसार परवानगी घ्यावी लागत असुन, औद्योगिक विकासासाठी पूरक वातावरण करण्यासाठी प्राथमिक सुविधांमध्ये वाढ करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) राज्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रात प्रस्तावित उद्योगांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत रस्ते, वीज, पाणी, मलनि:सारण इ. पायाभूत सूविधांनी युक्त असे विकसीत भूखंड रास्त दराने पुरविले जातात. नविन उद्योग सुरू करण्यासाठी करण्यात येणारी भूखंड वाटप प्रक्रिया संपूर्णत: संगणकीकृत असून नविन उद्योगांना देण्यात येणाऱ्या सर्व परवानग्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या एक खिडकी प्रणालीद्वारे विशिष्ट मुदतीमध्ये दिल्या जातात.

रू.५० कोटींच्यावर गुंतवणूक असलेल्या देशांतर्गत उद्योगांना तसेच विदेशी गुंतवणूकदारांना २० पेक्षा अधिक विभागांच्या १०० हून अधिक परवानग्या “महा परवाना” या एक खिडकी प्रणालीद्वारे मुदतबंध स्वरूपात देण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास विभागाअंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात आलेल्या कला, क्रिडा, संगणक शिक्षकांना पुर्ववत कामावर घेण्याबाबत

**(२९) * ३५१४६ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाअंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात आलेल्या कला, क्रिडा, संगणक शिक्षकांना पुर्ववत कामावर घेण्याबाबत लोकप्रतिनिधी वि.स.स. बल्लारपूर यांनी आयुक्त, आदिवासी विकास विभाग नाशिक यांना दिनांक १ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदिवासी शिक्षकांना नियुक्ती देण्यात आली त्यावेळी तीन वर्षांचा कालावधी नेमून देण्यात आलेला होता परंतु कोरोना कालावधीत मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान त्यांना कामावरून कमी करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तात्पुरत्या शिक्षकांना पुर्ववत कामावर घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) आदिवासी विकास विभागाअंतर्गत शासकीय आश्रमशाळांमध्ये कला, क्रिडा व संगणक शिक्षकांच्या नेमणूका प्रथमत: ११ महिन्यासाठी करार पध्दतीने करून आवश्यकतेनुसार पुढील मुदतवाढ देण्याचे शासनाचे धोरण होते. तथापि, मार्च, २०२० पासून कोविड-१९ विषाणूच्या संसर्गामुळे राज्य शासनाच्या धोरणानूसार सर्व शासकीय आश्रमशाळा बंद ठेवण्यात आल्या होत्या. त्यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देण्यात आली नाही.

-----------------

## डहाणू (जि. पालघर) तालुक्यांत संजय गांधी निराधार, इंदिरा गांधी अपंग योजना व अन्य योजनेच्या लाभार्थ्यांना मानधन देण्याबाबत

**(३०) * ३३२७८ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: डहाणू (जि. पालघर) तालुक्यात संजय गांधी निराधार योजनेंतर्गत ६२८७ लाभार्थी, इंदिरा गांधी अपंग योजनेतील २०००, इंदिरा गांधी वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेत ४७८८, इंदिरा गांधी विधवा निवृत्तीवेतन योजनेचे ५८ आणि श्रावणबाळ योजनेचे ८५५६ असे एकूण २१६८९ लाभार्थी असून त्यांना माहे एप्रिल, २०२१ ते जुन, २०२१ या दरम्यानाचे उदरनिर्वाह करण्याकरीता देण्यात येणारे मानधन मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाभार्थ्यांना मानधन मिळाले नसल्यामुळे त्यांना आर्थिक संकटाना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संजय गांधी योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानासाठी रुपये २१०००/- वार्षिक उत्पन्नाची अट कालबाह्य झाली असल्याने गांव तलाठी रु.३०,०००/- रक्कमेच्या वर उत्पन्नाचा दाखला देत असल्यामुळे ९०% अर्ज नामंजूर होत आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,
(५) असल्यास, त्याअनुषंगाने लाभार्थ्यांना तात्काळ मानधन देण्याबाबत व तसेच उत्पन्नची वार्षिक अट रु.२१०००/- वरुन ५०,००० /- करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) डहाणू तालुक्यामधील विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांना माहे सप्टेंबर, २०२१ पर्यंतचे अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले असून माहे ऑक्टोंबर, २०२१ चे अर्थसहाय्य वितरणाची कार्यवाही सुरु आहे.

विशेष सहाय्य योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांकरिता वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ५००००/- इतकी असून उर्वरित प्रवर्गातील लाभार्थ्यांकरिता उत्पन्नाची वार्षिक मर्यादा रु. २१०००/- इतकी आहे.

-----------------

## वरुड (जि. अमरावती) तालुक्यातील सन १९९१ च्या पुरामध्ये बाधित झालेल्या गावांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(३१) * ३४५७४ श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी)** : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरुड (जि. अमरावती) तालुक्यातील सन १९९१ च्या पुरामध्ये बाधित झालेल्या सुमारे ३१ गावांचे पुनर्वसन करण्यात आलेले नसून मूलभूत नागरी सुविधाही अद्याप पुरविण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या पाठपुराव्यामुळे सुमारे ३० वर्षांनंतर शासनाच्या संबंधित विभागाने सत्यशोधन समिती गठीत करुन २ महिन्यात अहवाल सादर करण्याचे आदेश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समिती गठीत करुन दोन महिने होऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने मागील ३० वर्षांपासून प्रतिक्षेत असलेल्या ३१ पुरबाधित गावांच्या यशस्वी पुनर्वसनासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार :** (१) अशंत: खरे आहे.

सन १९९१ मध्ये आलेल्या पुरामुळे अमरावती जिल्हयातील वरुड तालुक्यातील बाधित २८ गावांपैकी ८ गावांचे पुर्णत: व २० गावांचे अशंत: पुनर्वसन करण्यात आले आहे व तेथील नागरी सुविधेची काही कामे अपूर्ण आहेत. तसेच ३ गावांचे विशेष बाब म्हणून पुनर्वसन करण्यात येत असून नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(२) हे खरे आहे.
(३) पुनर्वसित गावांतील शिल्लक राहीलेल्या नागरी सुविधा कामांचे अंदाजपत्रके तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य वीज वितरण व इतर दोन वीज कंपन्यांतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३२) * ३२७०९ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसिटी वर्कर्स फेडरेशनमार्फत महाराष्ट्र राज्य वीज वितरण व इतर दोन वीज कंपन्यांतील रिक्त जागा भरण्यात याव्यात यासाठी मागील १० वर्षांपासून सातत्याने आंदोलने, मोर्चे व निवेदने सादर करुन मागणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महावितरण व इतर दोन वीज कंपन्यांमध्ये सध्या वर्ग-३ व वर्ग -४ मधील २५ हजारांहून अधिक पदांच्या जागासह अन्य संवर्गातील हजारो पदाच्या जागा रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महापारेषणमध्ये ८५०० नवीन व रिक्त पदे भरणार अशी घोषणाही करण्यात आली तसेच १० वर्ष आकृतीबंध आराखडा मंजुर होऊनही तो आजतागायत लागू करण्यात आलेला नसल्याने व जागा भरण्याचा ठोस निर्णय घेतला जात नसल्यामुळे दिनांक ४ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास मुंबईतील प्रकाशगड कार्यालयासमोर राज्यातील हजारो बेरोजगार विदयुत सहाय्यकाची भरती तात्काळ करावी म्हणून आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वेतनवाढ करार करताना तिन्ही कंपनीच्या व्यवस्थापनाने प्रत्येक वर्षी टप्प्या-टप्प्याने रिक्त जागा भरण्याचे मान्य केलेले असूनही त्याची अद्यापपर्यंत पूर्तता करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सन २०१४ मध्ये २५०० उपकेंद्र सहाय्यक पदाची जाहीरात निघुनही भरती रद्द करण्यात येऊन सन २०१९ मध्ये विद्युत सहाय्यक व उपकेंद्र सहाय्यकांच्या ७ हजार पदांची भरतीची प्रक्रिया सुरु करण्यात येऊनही, परंतु अद्यापर्यंत उक्त पदांची भरती करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, महावितरण व अन्य दोन वीज कंपन्यांमध्ये मोठया प्रमाणावर रिक्त असलेल्या जागा न भरण्याची नेमकी कारणे काय आहेत, तसेच बेरोजगारांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) व (२) अंशत: खरे आहे. महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसिटी वर्कर्स फेडरेशनमार्फत विविध विनंत्या व निवेदने सादर केली आहेत. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण), महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी (महापारेषण) व महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी (महानिर्मिती) मध्ये वर्ग ३ व ४ ची अनुक्रमे २६०५१, ४७३२ व ३२८० पदे अशी एकूण ३४०६३ पदे रिक्त आहेत. यात पदोन्नती व सरळसेवा भरतीच्या रिक्त पदांचा समावेश आहे.

(३) महापारेषण कंपनीमध्ये ८५०० नवीन व रिक्त पदे भरण्याची घोषणा ही सुधारित प्रशासकीय रचनेपूर्वीच्या आकृतीबंधावर आधारित होती. महापारेषण कंपनीने त्यांच्या दि. १५.०६.२०२१ च्या आदेशान्वये तांत्रिक पदांचा आकृतीबंध मंजुर केला असून त्यानुषंगाने वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदोन्नतीची व

सरळसेवा पदे कंपनीच्या नियमाप्रमाणे भरण्याची कार्यवाही महापारेषण कंपनीकडून सुरु आहे.

दि.०४.०१.२०२१ रोजी ओबीसी जनमोर्चा यांच्याद्वारे विदयुत सहायक पदाच्या भरतीसाठी सुमारे ६० ते ७० विदयार्थ्यांसह प्रकाशगड येथे आंदोलन केले असल्याचे महावितरण कंपनीने अवगत केले आहे.

(४) महावितरण, महापारेषण व महानिर्मिती कंपन्यांकडून पदोन्नती व सरळसेवा भरतीची रिक्त पदे नियमानुसार, शासन निर्णयानुसार आणि न्यायालयाचे आदेश विचारात घेऊन भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) महावितरण कंपनीकडून विद्युत सहायक पदांसाठी (५००० पदे) जाहिरात सन २०१९ मध्ये प्रसिध्द करण्यात आली. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि. ०५.०७.२०२१ अन्वये भरती प्रक्रिया राबविण्यासंदर्भात दिलेल्या मार्गदर्शक सूचना व उच्च न्यायालयात प्रलंबित याचिकांमध्ये दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने ई.डब्ल्यू.एस. प्रवर्ग वगळता इतर प्रवर्गातील निकाल प्रसिध्द करण्यात आला असून निवड झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांच्या पडताळणीनंतर पात्र उमेदवारांना नियुक्ती पत्र निर्गमित करण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात छतावरील सौर उर्जेला प्रोत्साहन देण्याबाबत

**(३३) * ३३९६६ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महावितरण कंपनीने छतावरील सौरउर्जेला प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घरगुती वीज ग्राहकांसाठी अशी सौरउर्जा यंत्रणा बसविण्यासाठी ४० टक्के अनुदान दिले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अधिकाधिक वीजग्राहकांनी सौरउर्जेला प्राधान्य द्यावे यासाठी जनजागृती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) होय, इमारतीच्या छतावरील (रूफ टॉप सोलर) सौर ऊर्जा बाबत दि.२०/८/२०१९ रोजी जाहीर केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार रूफ टॉप सौर योजना टप्पा-२ या योजनेची अंमलबजावणीची जबाबदारी महावितरण कंपनीकडे सोपविण्यात आली असून याबाबत केंद्र शासन व मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्या मार्गदर्शक सूचना व आदेशानुसार महावितरण कंपनीकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) होय, केंद्र शासनाच्या रूफ टॉप सौर योजना टप्पा-२ अंतर्गत घरगुती ग्राहकांकरीता सौर यंत्रणेच्या स्थापित क्षमता १ कि. वॅट ते ३ किलोवॅट पर्यंत ४० टक्के, ३ ते १० किलोवॅट पर्यंत २० टक्के आणि गट गृहनिर्माण संस्था व निवासी कल्याणकारी संघटना यांना निर्धारीत प्रकल्प खर्चाच्या २० टक्के अनुदान देय आहे.

(३) रूफ टॉप सौर योजना टप्पा-२ अंतर्गत सौर ऊर्जेच्या वापरास प्राधान्य देण्यासाठी महावितरण कंपनीव्दारे राज्यातील प्रमुख मराठी/हिंदी/इंग्रजी वृत्तपत्रामधून सदर योजनेची प्रसिध्दी देण्यात आली आहे, तसेच सर्व घरगुती ग्राहकांना सदर योजनेचा लाभ घेण्यासंदर्भात लघु संदेश (SMS) पाठविण्यात आले आहेत. या व्यतिरिक्त पुढील काळात महावितरण कंपनीच्या घरगुती वीज ग्राहकांच्या वीज देयकावर सदर योजनेची प्रसिध्दी करणे तसेच या योजनेची माहिती पत्रक महावितरण कंपनीच्या सर्व क्षेत्रिय कार्यालयामध्ये लावण्याबाबत कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे. सदर योजनेची संपूर्ण माहिती महावितरण कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ऊस उत्पादक शेतकऱ्यांना हमी भावाची रक्कम विहित मुदतीत देण्याबाबत

**(३४) * ३२४५३ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण)** : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९६६ च्या ऊस नियंत्रण कायद्यानुसार शेतातील ऊसाचे कारखान्यात गाळप झाल्यानंतर पुढील १४ दिवसांच्या आत वजन झालेल्या ऊसाचे देयक एफआरपी प्रमाणे शेतकऱ्यांना देणे बंधनकारक असल्याने मुदतीत हमी भावाची रक्कम ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न दिल्यास सदर रक्कमेवर १४ टक्के व्याज कारखान्यांनी शेतकऱ्यास देणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषीमुल्य आयोगाने ऊसाची हमी भावाची रक्कम तीन टप्प्यात देण्यास हरकत नसल्याची शिफारस केंद्र शासनाकडे केली असल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, राज्यात गळीत हंगामासाठी तयार असलेल्या १९० कारखान्यांनी नियमित ऊस दर न देणे तसेच विलंबाने ऊसाची रक्कम देणे आणि वेळेत ऊस दर न दिल्याने उक्त कारखान्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने सदरहू कारखान्यांची आर्थिक स्थिती दर्शविणाऱ्या माहितीचा लेखाजोगा जाहीर करण्याचा निर्णय शासनाने दिनांक २७ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने आर्थिक स्थिती चांगली असतानाही शेतकऱ्यांना थकीत हमी भावाची रक्कम न देणाऱ्या दोषी कारखान्यांविरुद्ध कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे काय, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त कारखान्यांवर कारवाई करुन थकीत हमी भावाची रक्कम शेतकऱ्यांना विनाविलंब उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) होय, हे अंशत:खरे आहे. ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ चे कलम ३(३) नुसार एफआरपीची अदायगी १४ दिवसात करणे बंधनकारक आहे. तसेच कलम ३ (३ A) नुसार एफआरपीची रक्कम ऊस उत्पादक शेतक-यांना १४ दिवसात न दिल्यास सदर रकमेवर कारखान्यानी शेतकऱ्यांना १५ टक्के व्याज देण्याची तरतूद आहे.
(२) केंद्र शासनाच्या पातळीवर निती आयोगाचा टास्क फोर्स व कृषिमुल्य आयोग यांनी एफआरपी टप्प्या टप्प्याने देणेबाबत केंद्र शासनास शिफारस केली आहे. केंद्र शासनाने तीन टप्प्यात FRP अदा करणेसंदर्भात अद्याप धोरणात्मक निर्णय घेतलेला नाही.
(३) साखर आयुक्तालयाने दिनांक २४/०९/२०२१ च्या परिपत्रकान्वये ऊसदर देण्याची आर्थिक सक्षमता प्रसिध्द केली आहे.

(४) नाही, हे खरे नाही.

(५) हंगाम २०२०-२१ मध्ये एफआरपीची रक्कम थकीत ठेवणा-या २७ साखर कारखान्यांवर ३२ आरआरसी आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्ह्यात कापूस खरेदी केंद्र सुरू करण्याबाबत

**(३५) * ३४१९९ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात माहे ऑक्टोबर, २०२० अखेर पर्यंत प्रत्यक्षात कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात न आल्याने शेतकऱ्यांना कमी भावात खाजगी व्यापाऱ्यांना कापूस विकावा लागला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यात दिनांक ३१ आक्टोबर, २०२० रोजीपर्यंत सी.सी.आय. कडून खरेदी कैंद्राची सुरूवात झाली नसल्याने राज्य शासनाने कापूस खरेदी सुरू करावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने अकोला जिल्ह्यात कापूस पणन महासंघाकडून खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) भारतीय कपास निगम लि. (सीसीआय) यांनी दि.१८.११.२०२० पासून तर कापूस पणन महासंघाने सी.सी.आय. चे उपअभिकर्ता म्हणून दि.२७.११.२०२० पासून अकोला जिल्ह्यात हमी दराने कापूस खरेदी सुरू केली होती.

(२) होय, स्थानिक लोकसभा सदस्यांनी याबाबत कापूस पणन महासंघाकडे मागणी केली होती.

(३) कापूस पणन महासंघाने सी.सी.आय. चे उपअभिकर्ता म्हणून अकोला जिल्ह्यात, बोरगांव, कानशिवणी, आपातापा व कंचनपूर या ४ कापूस खरेदी केंद्रांवर दि.२७.११.२०२० पासून कापूस खरेदी सुरू करुन एकूण ६६७४० क्विंटल कापसाची खरेदी केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मे.टोरंट पॉवर कंपनीकडून वीज ग्राहकांवर अन्याय होत असल्याबाबत

**(३६) * ३२६१५ श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मे. टोरंट पॉवर कंपनीमार्फत भिवंडीमध्ये सर्वसामान्य वीज ग्राहकांवर अन्याय सुरू असल्याने सदरहू वीज ग्राहकांनी तसेच लोकप्रतिनिधीनी सातत्याने तक्रारी केल्या असतानाही त्याची योग्य ती दखल घेतली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कळवा, मुंब्रा, शिळ-दिवा हा भागही टोरेंट पॉवर कंपनीला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, तसेच राज्यातील अन्य ठिकाणांपेक्षा शिळ-दिवा विभागाचा वीज वसुली दर ८० टक्के असून महावितरणमध्ये मोठ्या प्रमाणावर रिक्त असलेली पदे विनाविलंब भरण्यात यावीत अशी मागणी कल्याण ग्रामीण विभागातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ऊर्जा मंत्री, उपमुख्यमंत्री यांना दिनांक २१ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने मे.टोरंट कंपनीमधील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

महावितरणमध्ये मोठया प्रमाणात रिक्त असलेली पदे विनाविलंब भरण्यात यावीत अशी मागणी कल्याण ग्रामीण विभागातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ऊर्जा मंत्री यांना दि. २१ जानेवारी २०२० रोजीचे निवेदन देऊन केली आहे.

(३) शिळ, मुंब्रा व कळवा या उपविभागाअंतर्गतच्या वितरण व देखभालीचा कार्यभार दि. ०१.०३.२०२० पासून मे. टोरंट कंपनी लिमिटेडला वितरण फ्रॅन्चाइझी म्हणून हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. सन २०१६-१७ मध्ये मुंब्रा, शिळ व कळवा या उपविभागात वीज वितरण हानी ४४% इतकी होती या गोष्टीच्या अनुषंगाने महावितरणने मुंब्रा, शिळ व कळवा या उपविभागात फ्रॅन्चाइझी नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला. मे.टोरंट पॉवर कंपनी लिमिटेड ही फ्रॅन्चाइझी असल्यामुळे या कंपनीमध्ये रिक्त पदे महावितरण कडून भरली जात नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील धनगर समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबविण्याबाबत

**(३७) * ३२५२६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनगर समाजाला अनुसूचित जातीचे आरक्षण देण्याच्या अनुषंगाने तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांनी महाअधिवक्ता यांचे अभिमत घेवून आरक्षणाचा निर्णय होईपर्यंत अनुसुचित जातीसाठी ज्या योजना आदिवासी विकास विभागामार्फत सुरु आहेत त्या सर्व योजनांचा लाभ धनगर समाजाला लागू करण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) तसेच, तत्कालीन अर्थमंत्री यांनी माहे जुलै, २०१९ मधील अर्थसंकल्पीय अधिवेशनात आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी ज्या योजना राबविल्या जातात त्या धर्तीवर धनगर समाजाच्या विकासासाठी विविध २२ योजना राबविण्याचा मानस असल्याची घोषणा केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू घोषणेची अंमलबजावणी करण्यासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी रु.१०० कोटी एवढा निधी उपलब्ध करुन दिला असल्याचे घोषीत करण्यात आले होते, सदर घोषणेच्या अनुषंगाने २२२५६८२१ व २२२५६८३७ या दोन लेखा शिर्षकाखाली प्रत्येकी रु.२५० कोटी प्रमाणे रु.५०० कोटींची तरतुद केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू योजनेचा लाभ धनगर समाजाला मिळण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार :** (१), (२) व (३) होय. हे अंशत: खरे आहे.

(४) सदर योजनासाठी सन २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी रूपये ५०० कोटीची पुरवणी मागणीव्दारे केलेली होती. परंतू कोव्हीड-१९ च्या पार्शवभुमीवर दि.०४ मे, २०२० च्या वित्त विभागाच्या परिपत्रकानुसार कोविड-१९ परिस्थित कोणतीही नविन योजना न राबविण्याचे निर्देश दिले होते. सदर तरतूद वित्त विभागाकडून वितरीत करण्यात आलेली नाही. सन २०२०-२१ या वित्तीय वर्षासाठी रू.५१५०.०४ लक्ष इतकी तरतुद अर्थसंकल्पीत करण्यात आली

होती.त्यापैकी ४९.५० लक्ष इतकी तरतूद वितरीत करण्यात आली आहे. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात रुपये ८५.०० कोटी ०३ हजार इतकी अर्थसंकल्पिय तरतुद करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या कृषि पंपांना वीज जोडण्या देण्याबाबत

**(३८) * ३४०४१ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयात ४७५ कृषिपंपाच्या वीज जोडण्या दिनांक ३१ मार्च, २०२१ पूर्वीपासून प्रलंबित असल्याचे दिनांक २५ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेचा लाभ देण्यासाठी वीज वितरण कंपनीकडे पैसे भरुनही त्यांना कृषि पंप देण्यात आले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कृषिपंप जोडणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत :** (१) हे खरे आहे.
अमरावती जिल्हयात दि. ३१ मार्च, २०२१ अखेर ५१९६ कृषीपंप पैसे भरुन वीज जोडणीकरिता प्रलंबित होते.
(२) हे खरे नाही.
अमरावती जिल्हयातील मार्च-२०२१ अखेर पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ५१९६ कृषीपंपापैकी मार्च २०१८ पूर्वीचे १६८३ कृषीपंप व मार्च

२०१८ नंतरचे ३५१३ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते. उच्चदाब वितरण प्रणाली योजने मध्ये १६८३ कृषीपंपांपैकी ११४६ कृषीपंपाना दिलेल्या वीज जोडण्या देण्यात आल्या असून उर्वरित ५३७ कृषीपंपाची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच, मार्च २०१८ नंतरच्या पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ३५१३ कृषीपंपापैकी १७१९ ग्राहकांना शासनाच्या कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत व ४३० अर्जदारांना इतर योजने अंतर्गत अशा एकूण २१४९ कृषीपंपाना वीज जोडण्या देण्यात आलेल्या असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) दि. ३१ मार्च, २०१८ पूर्वी पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषीपंप ग्राहकांना उच्चदाब वितरण योजने अंतर्गत व इतर प्रलबिंत अर्जदारांना कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत वीज जोडणी देण्याचे प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथे जिल्हा जात पडताळणी समितीकडे अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(३९) * ३५३२९ श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी)** : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे गत सहा महिन्यांपासून जिल्हा जात पडताळणी समितीकडे अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याचे दिनांक २४ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन सदर प्रलंबित प्रकरणे तातडीने निकालात काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

माहे फेब्रुवारी, २०२१ अखेर ३ ते ६ महिन्यांतील एकूण ४६६ प्रकरणे, ६ महिन्यांवरील २ प्रकरणे व १ वर्षावरील ० (शून्य) प्रकरणे प्रलंबित होती. विशेष मोहिम राबवून सदर प्रकरणे निकाली काढण्यात येत आहेत.

(३) कोवीड-१९ च्या प्रादूर्भावामुळे लॉकडाऊन असल्यामुळे कर्मचारी उपस्थिती सुरवातीस १५ टक्के व नंतर ५० टक्के अशी होती. तसेच काही प्रकरणी अर्जदारास वारंवार कळवूनही त्रुटी पूर्तता होत नसल्याने सदरची प्रकरणे निकाली काढण्यास विलंब होतो.

-----------------

## राज्यात नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(४०) * ३२४५४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.राजेश पवार (नायगांव), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-**

**पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.बबनराव शिंदे (माढा), डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.चिमणराव पाटील (एरंडोल), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.दादाराव केचे (आर्वी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भासह राज्यात माहे मार्च, २०२० ते माहे ऑक्टोबर, २०२१ या कालावधी दरम्यान अतिवृष्टी, गुलाब चक्रीवादळ, महापुर व गारपीट अश्या विविध नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे व नागरीकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नुकसानीचे राज्यातील बहुतांश जिल्ह्यात नुकसानग्रस्त विभागातील पंचनामे करण्याचे काम संथगतीने सुरु असल्याने नुकसानग्रस्तांना शासनाकडून मदत मिळण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाकडे नैसर्गिक संकटातील पुरग्रस्त व आपत्ती ग्रस्तांच्या मदतीसाठी शासनाला पुरेसा निधी मिळावा याकरिता मदत व पुनर्वसन विभागाने प्रस्ताव पाठविला असून उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनास निधी प्राप्त झाला आहे काय, नसल्यास, उक्त प्रकरणी शासनाने केंद्रशासनाकडून पाठपुरावा केला आहे काय,

(४) असल्यास, अतिवृष्टी व महापूर यामुळे होणारे नुकसान कमी होण्याच्या दृष्टीने पुराच्या पाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी राज्यस्तरीय तज्ञांची पूर व्यवस्थापन समिती नेमण्यासाठी वा पूर नियंत्रण कायदा आणण्यासाठी तसेच नदी काठच्या भागात संरक्षक भिंत बांधण्यासाठी शासन विचाराधीन आहे काय,

(५) तसेच, राज्यातील अतिवृष्टी व पुरामुळे शेतपिकांचे तसेच नागरीकांच्या मालमत्तेचे झालेल्या नुकसानीबाबत शासनाने १० हजार कोटी रुपयांची मदत जाहिर केल्याचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले असून उक्त मदतीचा तपशिल जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा, अशी सूचना शासन निर्णयाद्वारे दिलेली असूनही अद्यापही अशा प्रकारची यादी व लाभार्थ्यांच्या मदतीचा तपशिल जिल्ह्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ओला दुष्काळ जाहिर करुन नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसान ग्रस्त भागाची पाहणी व पंचनामे करुन नुकसानग्रस्तांना तातडीने मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार :** (१) खरे आहे,

(२) खरे नाही,

(३) तौक्ते चक्रीवादळीमुळे झालेल्या नुकसानीकरिता रू.२०३.३४ कोटी निधीच्या मदतीचे ज्ञापन केंद्र शासनास दि.०२.०७.२०२१ रोजी सादर करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे जुलै, २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या पुरपरिस्थितीकरिता रू.१६५९.५१ कोटी निधीच्या मदतीचे ज्ञापन केंद्र शासनास दि.२०.०९.२०२१ रोजी सादर करण्यात आले आहे. सदर दोनही ज्ञापनाच्या अनुषंगाने निधी अद्याप अप्राप्त आहे.

ऑगस्ट ते सप्टेंबर, २०२१ मध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीकरिता मदतीच्या नुकसानीचे ज्ञापन पाठविण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) होय,

पुराच्या पाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी जलसंपदा विभागामार्फत राज्यस्तरीय तज्ञांच्या विविध समित्या गठीत करण्यात आल्या असून त्या खालीलप्रमाणे आहे :-

१) पेंडसे समिती, १९९२ - महाड पूर अभ्यास समिती

२) वडनेरे समिती, २००७ - महाराष्ट्रातील पूर परिस्थितीबाबत अभ्यास समिती

३) वडनेरे समिती, २०१९ - कृष्णा खोऱ्यातील पूर परिस्थितीबाबत अभ्यास समिती

४) पवार समिती, २०२१ - भीमा खोऱ्यातील पूर परिस्थितीबाबत अभ्यास समिती

उक्त समित्यांनी दिलेल्या अहवालातील शिफारशीनुसार जलसंपदा विभागामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे पूराचा संभाव्य धोका टाळण्याकरिता जलसंपदा विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाकडून पूराच्या दृष्टीने पाहणी होऊन आवश्यक ठिकाणी पूर संरक्षक भिंत बांधणेकरिता शासन निर्णय, क्र.पूसंभि-२०१९/(प्र.क्र.११५/२०१९)/सिं.व्य.(म.), दि.३१.०८.२०१९ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही केली जाते.

(५) अंशत: खरे आहे,

राज्यातील विविधि जिल्हयात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीसंदर्भात दि.०३.०८.२०२१ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये राज्य मंत्रिमंडळाने ११,५०० कोटी रूपये तरतूदीस मान्यता दिली असून यामधून मदतीसाठी रू.१५०० कोटी, पुनर्बांधणीसाठी रू.३००० कोटी व आपत्ती सौम्यीकरणासाठी रू.७००० कोटी एवढया खर्चास मान्यता दिली आहे. तसेच लाभार्थ्यांच्या मदतीचा तपशील अनुदान वाटपाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर जिल्हयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतो.

(६) ऑगस्ट ते सप्टेंबर, २०२१ मध्ये अतिवृष्टीमुळे शेतीपिकांच्या झालेल्या नुकसानीकरिता शासन निर्णय, दि.२६.११.२०२१ अन्वये देयक असलेल्या

रक्कमेच्या ७५% म्हणजे रू.२८६०८४.०७ लक्ष व शासन निर्णय, दि.२७.११.२०२१ अन्वये रू.७७४१५.४३ लक्ष असे एकूण रू.३६३४९९.५० लक्ष इतका निधी बाधित शेतकऱ्यांना वितरीत करण्यात आला आहे.

-----------------

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.